पुढारी

25 APR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'नेचर' ई-जर्नल वापरात शिवाजी विद्यापीठ देशात दुसरे

## जागतिक पुस्तक दिनाच्या पूर्वसंध्येला पुरस्कार घोषित; ऑनलाईन जर्नलचा चिकित्सकपणे वापर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जागतिक स्तरावरील नामांकित पालग्रेव्ह मॅकमिलन समूहाच्या 'नेचर पब्लिशिंग ग्रुप'तर्फे 'एनपीजी ई-जर्नल्स युसेज ॲवॉर्ड-२०१५'मधील द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार शिवाजी विद्यापीठाला घोषित झाला आहे. यामुळे विद्यापीठातील विद्यार्थी संदर्भासाठी ऑनलाईन ई-जर्नल सुविधांचा चिकित्सकपणे वापर करीत असल्याचे स्पष्ट झाले आहे. 'युनेस्को'च्या जागतिक पुस्तक व कॉपीराईट दिनाच्या पूर्वसंध्येला हा पुरस्कार घोषित झाला आहे, हे विशेष.



**शिवाजी विद्यापीठातून**

यूजीसीतर्फे विद्यापीठांसाठी इन्फोनेट डिजिटल लायब्ररी कॉन्सॉर्शियम (इनफ्लिबनेट) हा महत्त्वपूर्ण उपक्रम राबवीत आहे. या अंतर्गत विद्यापीठातील संशोधक विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणारे जगभरातील विविध विषयांचे जर्नल (संशोधन पत्रिका) व अधिकृत डाटाबेस उपलब्ध करून देण्यात येतात. संशोधक विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयातील जगभरातील अद्ययावत ज्ञान उपलब्ध होऊन त्यांचे संशोधन अधिक परिपूर्ण व्हावे, हा हेतू आहे. सद्य:स्थितीत शिवाजी विद्यापीठात सबस्क्रिप्शनच्या माध्यमातून ५१ आणि इन्फ्लिबनेटच्या माध्यमातून ८५९२ अशी ८६४३ ई-जर्नल व १० डाटाबेस संशोधक विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत. यामधील नेचर संशोधनपत्रिकेच्या व्यक्तिगत वापरामध्ये २०१५मध्ये भरीव वाढ झाली आहे.

इन्फ्लिबनेटच्या ई-जर्नल वापराच्या आकडेवारीनुसार ३४ वरून १८४४ इतकी संख्या झाली आहे. त्यामुळेच विद्यापीठ या पुरस्कारास पात्र ठरले आहे. केवळ नेचर संशोधन पत्रिकाच नव्हे इतर संशोधन पत्रिकांच्या वापरातही २०१५ मध्ये भरीव वाढ दिसून आली आहे. विद्यापीठातील इन्फ्लिबनेट संशोधक वापरकर्त्यांची संख्या २०१४ मध्ये २ लाख ८९ हजार ९२३ इतकी होती. २०१५ मध्ये ३ लाख ४ हजार ५५२ इतकी झाली आहे, अशी माहिती ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी दिली.

### 'कोचीन युनिव्हर्सिटी'ला पहिला पुरस्कार

यूजीसी-इन्फ्लिबनेट सुविधेच्या माध्यमातून नेचर समूहाचे जर्नल संदर्भासाठी सर्वाधिक वापरल्याबद्दल नेचर पब्लिशिंग ग्रुपतर्फे हा पुरस्कार शिवाजी विद्यापीठास घोषित झाला आहे. नेचर प्रकाशन समूहाचे भारतातील सहायक सरव्यवस्थापक राजेंद्र कुमार यांनी ई-मेलद्वारे ही माहिती दिली आहे. प्रथम क्रमांकाचा पुरस्कार 'एनपीजी ई-जर्नल्स युसेज ॲवॉर्ड-२०१५' कोचीन युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स ॲंड टेक्नॉलॉजी व तृतीय क्रमांकाचा पुरस्कार जवाहरलाल नेहरू विद्यापीठाला जाहीर झाला आहे.

"

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे नुकत्याच घोषित झालेल्या 'एन.आय.आर.एफ.' रँकिंगमध्ये देशात २८ वे आणि राज्यात पहिले स्थान मिळविल्यानंतर 'नेचर'च्या वापरातही विद्यापीठाने देशात दुसरा क्रमांक प्राप्त केला, हा एक उत्साहवर्धक बहुमान आहे. विद्यापीठातील संशोधक मूलभूत संशोधनामध्ये उत्तम कामगिरी बजावत आहेत, हे स्कोपसच्या आकडेवारीवरुन वेळोवेळी स्पष्ट झाले आहे. 'नेचर'सारख्या जागतिक दर्जाच्या प्रतिष्ठित संशोधन पत्रिकेचा संदर्भ म्हणून विद्यापीठातील संशोधक विद्यार्थी गांभीर्याने वापर करीत आहेत, ही समाधानाची बाब आहे. यूजीसी–इनफ्लिबनेटच्या माध्यमातून जगभरातील आठ हजारांहून अधिक जर्नल विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली आहेत.

**– डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरु**

तरुण भारत
25 APR 2016
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ई–जर्नल वापरामध्ये शिवाजी विद्यापीठ देशात दुसरे

प्रतिनिधी
कोल्हापूर

जागतिक स्तरावरील नामांकित पालग्रेव्ह मॅकमिलन समूहाच्या 'नेचर पब्लिशिंग ग्रुप' तर्फे 'एनपीजी ई–जर्नल्स युसेज ॲवॉर्ड–२०१५ मधील व्दितीय क्रमांकाचा पुरस्कार शिवाजी विद्यापीठाला घोषित करण्यात आला आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी दिली.

'युनेस्को'च्या जागतिक पुस्तक व कॉपीराईट दिनाच्या पूर्वसंध्येला हा पुरस्कार घोषित झाला आहे. युजीसी इन्फ्लिबनेट सुविधेच्या माध्यमातून नेचर समूहाचे जर्नल संदर्भासाठी सर्वाधिक वापरल्याबद्दल नेचर पब्लिशिंग ग्रुपतर्फे हा पुरस्कार घोषित झाला आहे. नेचर प्रकाशन समूहाचे भारतातील सहाय्यक सरव्यवस्थापक राजेंद्र कुमार यांनी ई–मेलद्वारे ही माहिती दिली आहे. शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी या ई–जर्नल सुविधांचा अत्यंत चिकित्सकपणे अभ्यास करीत आहेत. प्रथम क्रमांक 'एनपीजी ई–जर्नल्स युजेस ॲवॉर्ड–२०१५' कोचीन येथील कोचीन युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजीला तर तृतीय क्रमांकाचा पुरस्कार नवी दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाला जाहीर झाला आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी)तर्फे विद्यापीठांसाठी इन्फ्लिबनेट अर्थात इन्फोनेट डिजिटल लायब्ररी कॉन्सॉर्शियम हा अत्यंत महत्त्वपूर्ण उपक्रम राबविलेला आहे. याअंतर्गत संशोधक विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे विविध विषयातील जर्नल व अधिकृत डेटाबेस उपलब्ध करून दिला जातो. शिवाजी विद्यापीठातील सबस्क्रिप्शनच्या माध्यमातून ५१ आणि इन्फ्लिबनेटच्या माध्यमातून ८ हजार



५९२ अशी एकूण ८ हजार ६४३ ई–जर्नल व १० डाटाबेस संशोधक विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत. यामधील नेचर संशोधन पत्रिकेच्या व्यक्तीगत वापरामध्ये सन २०१४ च्या तुलनेत सन २०१५ मध्ये जास्त नोंद झाली आहे. इन्फ्लिबनेटच्या ई–जर्नल वापराच्या आकडेवारीनुसार हा आकडा ३४ वरून १ हजार ८४४ इतका वाढला आहे. त्यामुळे नेचर पब्लिशिंग ग्रुपच्या व्दितीय पुरस्कारास शिवाजी विद्यापीठ पात्र ठरले.

**विद्यापीठाच्या क्रमवारीत आणखी एक मानाचा तुरा**

विद्यापीठातील संशोधक मूलभूत संशोधनामध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. नेचर सारख्या जागतिक दर्जाच्या संशोधन पत्रिकेचा संदर्भ म्हणून विद्यापीठातील संशोधक वापर करीत आहेत. ही गोष्ट समाधानाची आहे. युजीसी– इन्फ्लिबनेटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आठ हजारांपेक्षा जास्त जर्नल उपलब्ध करून दिली जात आहेत. 'एन. आय. आर. एफ.' रँकिंगमध्ये देशात २८ वे आणि राज्यात पहिले स्थान मिळाल्यानंतर 'एनपीजी ई–जर्नल्स युसेज ॲवॉर्ड–२०१५ मधील व्दितीय क्रमांकाचा पुरस्कार हा बहुमान आहे, अशी प्रतिक्रिया शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू देवानंद शिंदे यांनी दिली.

# Special Achievement For University: V-C

# Varsity comes second in e-journal use in country

Piyush.Bhusari@timesgroup.com

**Kolhapur:** A recent Infonet Digital library consortium (INFLIBNET) report stated that the Shivaji University, Kolhapur (SUK) stands second in use of Nature publications group's (NPG) e-journal usage in the country.

The Jawaharlal Nehru University (JNU) stands third in the usage of the coveted scientific journal.

The University Grants Commission (UGC) provides the INFLIBNET service to universities across the country.

The service offers over 8,000 scientific journals in its network, including the Nature journal.

It also revealed that the number of Nature scientific journal users in the SUK have risen from a mere 34 in 2014 to more than 1,800 in 2015.

Devanand Shinde, SUK's vice-chancellor said that it is a special achievement for the university after having also accomplished first rank in the National Institution Ranking Framework (NIRF) at the state-level last month.

Shinde said that over 3,000 computers are connected via INFLIBNET in the university campus and the service of journals is open 24x7 for the students.

**Devanand Shinde, SUK's vice-chancellor said that it is a special achievement for the university after having also accomplished first rank in the National Institution Ranking Framework (NIRF) at the state-level last month**

Namita Khot, the university librarian, said that the Cochin University of Science and Technology has won the first prize of the NPG e-journal usage award, followed by the SUK.

She added, Rajendra Kumar, assistant general manager of NPG emailed the university about the feat on April 22.

Khot further said that the university subscribed to 8,643 scientific journals via its own services and the INFLIBNET.

# 'Principals need to develop decision-making skills'

**Kolhapur:** Deputy education director of the Kolhapur division, M K Gondhali, on Saturday stressed on the need for principals to develop decision-making skills. He was speaking at the one-day principals' workshop held at Kolhapur Institute of Technology (KIT) College of Engineering.

Gondhali said that a principal needs to be professional with his decisions, but he must also be compassionate enough to know students' issues, both social and financial, to make better judgments at the administrative level.

A college official said that other speakers also gave lectures on communication and the constructive modes of education.

A Shivaji University, Kolhapur (SUK) official said that the event is important as the oprincipal's post is vacant in around 100 colleges of the university. According to the official, the situation has not improved over the past few years and most of the colleges have to rely on the acting principal for official communication. TNN

# Send info or face action: SUK tells colleges

The Shivaji University, Kolhapur (SUK) has asked affiliated colleges to send information regarding academic and administrative departments by April 27 for the Centre's Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA) scheme.

The university issued a circular on April 21 on the same. If any particular college fails to send the information on time, the SUK has said that it will not accept the annual affiliation application or the application regarding the exam.

RUSA panel members had visited the university in the first week of April to record the university's academic achievements through direct interaction with faculties. Following this visit, the panel sent a mail to the university asking for all the required details by April 27.

A university official said that the RUSA scheme provides hefty financial assistance for the infrastructure development. Colleges accredited with an 'A' grade by the National Accreditation and Assessment Council (NAAC) are eligible for the scheme.

Last year, the state directorate of higher education asked colleges to file proposals under the RUSA scheme. However, these were not properly filled in by the colleges and they had to be re-submitted later last year. An official said that the university does not want a repeat of last year's poor response and so will take strict action this year.

The Centre's ministry of human resource development in 2013 launched RUSA for higher education development, to promote infrastructure development in universities.

Through its funding, RUSA aims to increase student enrolment in the higher education system. As per RUSA guidelines, 65% funds are provided by the Centre and 35% grants are provided by the state. TNN

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत 25 APR 2016

# कमला कॉलेजला 'कॉलेज वुईथ पोटॅन्शियल फॉर एक्सलन्स' दर्जा

## दीड कोटी अनुदान : यु.जी.सी.कडून निवड

**कोल्हापूर :** विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्लीमार्फत कमला महाविद्यालयाची 'कॉलेज वुईथ पोटॅन्शियल फॉर एक्सलन्स' योजनेंतर्गत निवड झाली आहे. या योजनेंतर्गत महाविद्यालयास शैक्षणिक दर्जा उंचाविण्यासाठी युजीसीकडून दीड कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त होणार आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे सचिव डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पाटील म्हणाले, या योजनेसाठी देशभरातील एकूण ३५० महाविद्यालयांचे प्रस्ताव आले होते. त्यापैकी २४० महाविद्यालयांची प्रत्यक्ष मुलाखतीसाठी निवड करण्यात आली. त्यातून १२४ महाविद्यालयांची कॉलेज वुईथ पोटॅन्शिअल फॉर एक्सलन्स दर्जासाठी अंतिम निवड करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्रातील २८ महाविद्यालयांचा, तर शिवाजी विद्यापीठातील तीन महाविद्यालयांचा समावेश आहे. विशेष म्हणजे जिल्ह्यातील एकमेव कमला कॉलेजची योजनेसाठी निवड झाली आहे, असे त्यांनी सांगितले.

पाटील म्हणाले, या अनुदानातून महाविद्यालयात अध्ययन, अध्यापन, संशोधन, विस्तार कार्य व स्पर्धा परीक्षा, खेळ, सांस्कृतिक, व्यक्तिमत्त्व व नेतृत्व शिबिर, संशोधनवृत्ती, संस्कृती विकसित करणे, कन्सल्टन्सी, ऑफिस संगणकीकरण याकरिता फायदा होणार आहे. या सोयीसुविधांमुळे महाविद्यालय पुढील तीन वर्षांत अधिक गतीने उत्कृष्टतेकडे वाटचाल करेल व या योजनेसाठी निश्चितच पात्र ठरेल.

याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. एस. एन. पवार, प्रभारी प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील, डॉ. व्ही. व्ही. मैंदर्गी, प्रा. रेखा पंडित, आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

25 APR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डीकेटीईच्या ११ विद्यार्थ्यांची प्लेसमेंटसाठी निवड



इचलकरंजी : येथे प्लेसमेंटसाठी निवड झालेले डीकेटीईतील विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य डॉ. पी. व्ही. कडोले, डॉ. यू. जे. पाटील, प्रा. एस. बी. अकिवाटे आदी.

**इचलकरंजी / प्रतिनिधी :**

येथील डीकेटीईच्या टेक्स्टाईल ॲन्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटच्या टेक्स्टाईल विभागामधील ११ विद्यार्थ्यांची शाही एक्स्पोर्टस्, शिमोगा येथे चांगल्या पॅकेजवर निवड झाली आहे. डीकेटीई इन्स्टिट्यूटमधील टेक्स्टाईल इंजिनिअरिंग विद्यार्थ्यांचा १०० टक्के प्लेसमेंटचा विक्रम कायम आहे. अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण होण्याआधीच मुलांना चांगल्या पगाराची नोकरी देण्यास डीकेटीईचा टेक्स्टाईल विभाग अग्रेसर आहे. पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रात्यक्षिकालासुध्दा तितकेच महत्त्व देणारे डीकेटीईचे विद्यार्थी नेहमीच सर्व क्षेत्रात अग्रेसर ठरतात. यामुळेच इंजिनिअरिंगमध्ये टेक्स्टाईल इंजिनिअरिंगचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

शाही एक्स्पोर्टस्, बेंगलोर ही गारमेंटची उत्पादन करणारी नावाजलेली मोठी कंपनी आहे. याच कंपनीचे नवीन प्लॅन्ट शिमोगा येथे स्थापन झाले आहेत. येथे स्पिनिंग, निटींग व प्रोसेसिंगच्या अत्याधुनिक मशिनरी आहेत. त्यासाठी लागणाऱ्या कुशल तंत्रज्ञांची निवड करण्यासाठी शाही एक्स्पोर्टस् यांचे प्रतिनिधी यांनी डीकेटीईस भेट दिली व रिटन टेस्ट व पर्सनल इंटरव्ह्यूव्दारे विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासली व त्यातून ११ विद्यार्थ्यांची उत्तम पॅकेजवर प्लेसमेंट केली आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे अनुक्रमे गवळी अमर सुभाष, उकिर्डे राजतिलक हेमंत, कनकालिया प्रदीप एस., कांबळे प्रमोद मधुकर, टाक शुभम सुरेशचंद्र, सुमितकुमार आशुतोषकुमार सिंग, पाटील नितीन दादासो, वसगडे कपिल बंडू, कुंभार स्वप्निल अनिल, पाटील सागर शिवाजी, सांगले अनिल विलास अशी आहेत. यातून पदवी संपन्न केलेल्या विद्यार्थ्यांना २.४० लाख वार्षिक व पदविका संपन्न केलेल्या विद्यार्थ्यांना १.८० लाख वार्षिक इतक्या पॅकेजवर त्यांची निवड केली आहे.

डीकेटीई संस्थेमध्ये विद्यार्थ्यांची नियमित अभ्यासक्रमाबरोबर इंडस्ट्रीयल ट्रेनिंग, सॉफ्टस्कील ट्रेनिंग असे विविध विषयावरील उपक्रम विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी घेतले जातात, त्याचा मोठा फायदा विद्यार्थ्यांना होतो. त्यामुळेच दरवर्षी विद्यार्थ्यांची ट्रेनिंग व प्लेसमेंटची जबाबदारी प्रा. एस. बी. अकिवाटे हे सांभाळत आहेत. प्राचार्य प्रा. डॉ. पी. व्ही. कडोले, टेक्स्टाईल विभागप्रमुख प्रा.डॉ. यू. जे. पाटील, डिप्लोमा विभागप्रमुख प्रा. एस. ए. शेट्टी यांनी प्लेसमेंट झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.

**'एनपीजी ई-जर्नल यूसेज' पुरस्कार जाहीर :** संदर्भ- सुविधांचा विद्यार्थ्यांकडून चिकित्सकपणे वापर

# संशोधन पत्रिकांच्या वापरात विद्यापीठाची आघाडी

**कोल्हापूर :** इन्फ्लिबनेट माध्यमातून शिवाजी विद्यापीठाने नेचर समूहाची संशोधनपत्रिका (जर्नल) संदर्भासाठी सर्वाधिक वापरली आहे. त्याबद्दल जागतिक पातळीवरील पालग्रेव्ह मॅकमिलन समूहाच्या नेचर पब्लिशिंग ग्रुपतर्फे विद्यापीठाला सन २०१५चा 'एनपीजी ई-जर्नल्स युसेज अवॉर्ड' हा द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार शुक्रवारी जाहीर झाला आहे.

गेल्या महिन्यात नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्कच्या क्रमवारीतील देशात २८वे आणि राज्यात पहिले स्थान मिळविले होते. आता 'नेचर'च्या पुरस्काराद्वारे पुन्हा एका बहुमानाचे विद्यापीठ मानकरी ठरले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे (युजीसी) विद्यापीठांसाठी इन्फोनेट डिजिटल लायब्ररी कॉन्सॉर्शियम (इन्फ्लिबनेट) हा उपक्रम राबविला जातो. याअंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातर्फे संशोधक विद्यार्थ्यांसाठी जगभरातील विविध विषयांच्या संशोधनपत्रिका आणि अधिकृत डाटाबेस उपलब्ध करुन दिला जातो.

सध्या विद्यापीठात सबस्क्रिप्शनच्या माध्यमातून ५१ आणि इन्फ्लिबनेटच्या माध्यमातून ८५९२ अशी एकूण ८६४३ ई-जर्नल व १० डाटाबेस संशोधक विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत. यातील नेचर संशोधनपत्रिकेच्या व्यक्तिगत वापरामध्ये सन २०१४ च्या तुलनेत सन २०१५मध्ये वाढ झाली. इन्फ्लिबनेटच्या आकडेवारीनुसार ई-जर्नल वापराचा हा आकडा ३४ वरुन १८४४ इतका वाढला.

त्यामुळे नेचर ग्रुपच्या द्वितीय पुरस्कारास शिवाजी विद्यापीठ पात्र ठरले. यातील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार कोचीन युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी आणि तृतीय क्रमांकाचा पुरस्कार नवी दिल्लीच्या जवाहरलाल नेहरु विद्यापीठाला जाहीर झाला असल्याची माहिती 'नेचर'चे भारतातील सहाय्यक सरव्यवस्थापक राजेंद्र कुमार यांनी ई-मेलद्वारे दिली. विद्यापीठाला जाहीर झालेल्या संबंधित पुरस्कारामुळे विद्यापीठाचे विद्यार्थी संदर्भासाठी ऑनलाईन ई-जर्नल सुविधांचा चिकित्सकपणे वापर करीत असल्याचे स्पष्ट झाले आहे. (प्रतिनिधी)

> शिवाजी विद्यापीठातील संशोधक मूलभूत संशोधनामध्ये अत्यंत उत्तम कामगिरी बजावत आहेत. ते 'स्कोपस'च्या आकडेवारीवरुन स्पष्ट झाले आहे. 'नेचर' या जागतिक दर्जाच्या संशोधन पत्रिकेचा संदर्भ म्हणून विद्यापीठातील संशोधक विद्यार्थी गांभीयनि वापर करीत आहेत, ही समाधानाची बाब आहे.
>
> **- कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे**

> नेचर संशोधन पत्रिकाच नव्हे, तर अन्य संशोधन पत्रिकांच्या एकूण वापरातही सन २०१५मध्ये वाढ झाली आहे. विद्यापीठातील इन्फ्लिबनेट संशोधक वापरकर्त्यांची संख्या सन २०१४ मध्ये २ लाख ८९ हजार ९२३ इतकी होती. सन २०१५मध्ये ३ लाख ४ हजार ५५२ झाली आहे. जागतिक पुस्तक दिनाच्या पूर्वसंध्येला हा पुरस्कार घोषित झाल्याचा विशेष आनंद आहे.
>
> **-डॉ. नमिता खोत,**
> ग्रंथपाल, शिवाजी विद्यापीठ

**मटा अँकर** नेचर पब्लिशिंग ग्रुपच्या 'एनपीजी ई-जर्नल युसेज अॅवॉर्ड - २०१५' ने विद्यापीठाचा गौरव

# ई-जर्नल वापरात शिवाजी विद्यापीठ देशात द्वितीय

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**



जागतिक स्तरावरील नामांकित पालग्रेव्ह मॅकमिलन समूहाच्या 'नेचर पब्लिशिंग ग्रुप'तर्फे 'एनपीजी ई-जर्नल्स युसेज अॅवॉर्ड-२०१५' मधील द्वितिय क्रमांकाचा पुरस्कार शिवाजी विद्यापीठाला घोषित झाला आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी दिली. प्रथम क्रमांकाचा पुरस्कार कोचीन युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीला तर तृतीय क्रमांकाचा अॅवॉर्ड नवी दिल्लीच्या जवाहरलाल नेहरु विद्यापीठास जाहीर झाला आहे. 'युनेस्को'च्या जागतिक पुस्तक व कॉपीराइट दिनाच्या पूर्वसंध्येला हा पुरस्कार घोषित झाल्याचा आनंद अधिक असल्याचेही खोत म्हणाल्या.

डॉ. खोत म्हणाल्या, 'युजीसी-इन्फ्लिबनेट सुविधेच्या माध्यमातून नेचर समूहाचे जर्नल संदर्भासाठी सर्वाधिक वापरल्याबद्दल नेचर पब्लिशिंग ग्रुपतर्फे हा वैशिष्ट्यपूर्ण पुरस्कार घोषित झाला आहे. नेचर प्रकाशन समूहाचे भारतातील सहाय्यक सरव्यवस्थापक राजेंद्र कुमार यांनी ई-मेलद्वारे ही माहिती दिली आहे. शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी संदर्भासाठी ऑनलाइन ई-जर्नल सुविधांचा अत्यंत चिकित्सकपणे वापर करीत असल्याचे यामुळे स्पष्ट झाले आहे. विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) यांच्यातर्फे विद्यापीठांसाठी इन्फ्लिबनेट अर्थात इन्फोनेट डिजीटल लायब्ररी कॉन्सॉर्शियम हा अत्यंत महत्त्वपूर्ण उपक्रम राबविलेला आहे. याअंतर्गत विद्यापीठातील संशोधक विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणारे जगभरातील विविध विषयांचे जर्नल (संशोधन पत्रिका) व अधिकृत डाटाबेस उपलब्ध करून देण्यात येतात. जेणेकरून संबंधित संशोधक विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयातील जगभरातील अद्ययावत ज्ञान उपलब्ध व्हावे आणि त्यांचे संशोधन अधिक परिपूर्ण व्हावे. आजघडीला शिवाजी विद्यापीठात सबस्क्रिप्शनच्या माध्यमातून ५१ आणि इन्फ्लिबनेटच्या माध्यमातून ८ हजार ५९२ अशी एकूण ८ हजार ६४३ ई-जर्नल व १० डाटाबेस संशोधक विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत. यामधील नेचर संशोधन पत्रिकेच्या व्यक्तिगत वापरामध्ये सन २०१४ च्या तुलनेत सन २०१५ मध्ये भरीव वाढ झाल्याची नोंद झाली आहे. इन्फ्लिबनेटच्या ई-जर्नल वापराच्या आकडेवारीनुसार, हा आकडा ३४ वरुन १८४४ इतका वाढला. त्यामुळेच नेचर पब्लिशिंग ग्रुपच्या द्वितिय पुरस्कारास शिवाजी विद्यापीठ पात्र ठरले आहे.'








शिवाजी विद्यापीठातील संशोधक मूलभूत संशोधनामध्ये अत्यंत उत्तम कामगिरी बजावत आहेत, हे 'स्कोपस'च्या आकडेवारीवरुन वेळोवेळी स्पष्ट झाले आहे. 'नेचर'सारख्या जागतिक दर्जाच्या अत्यंत प्रतिष्ठित संशोधन पत्रिकेचा संदर्भ म्हणून विद्यापीठातील संशोधक विद्यार्थी अत्यंत गांभीर्याने वापर करीत आहेत, ही अतिशय समाधानाची बाब आहे.

\- डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू

**युजीसी इन्फोनेट डिजिटल लायब्ररी वापर**

| प्रकार | वापर (संख्या) |
|---|---|
| सायन्स डायरेक्ट | १,६६,६९७ |
| अमेरिकन केमिकल सोसायटी | ३४,६५६ |
| स्प्रिंगर लिंक | २७,३९९ |
| रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्री | २६,२८० |
| वेली ब्लॅकवेल | १७,३३४ |
| टेलर अँड फ्रंसीस | ८,७०२ |
| जेएसटीओआर | ८,५१८ |
| इन्स्टिट्यूट ऑफ फिजिक्स | ४,१७३ |
| अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ फिजिक्स | ३,८२० |
| ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस | २,७९७ |
| नेचर | १,८४४ |

# पहिल्या २५ विद्यापीठांत येण्याचे ध्येय

**एक वर्षापूर्वी कुलगुरुपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर प्रामुख्याने संशोधनावर भर देत विद्यापीठाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीयस्तरावर पोहोचवण्याचा प्रयत्न केला. नुकत्याच केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने नॅशनल इन्स्टिट्यूट रॅंकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) च्या राष्ट्रीय क्रमवारीमध्ये देशात २८ वे तर राज्यात अकृषी विद्यापीठामध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. केवळ या यशावर अवलंबून राहता देशपातळीवर पहिल्या २५ विद्यापीठांमध्ये स्थान मिळवण्यासाठी अधिक प्रयत्नशील राहणार आहे. यासाठी लोकप्रतिनिधी, विविध सामाजिक संघटना, विभागाचे प्रमुख, संस्था चालकांचे मार्गदर्शन घेतले जाणार आहे. विद्यापीठाचे संशोधन समाजोपयोगी ठरण्यासाठी पदवीस्तरापासून संशोधनाचा अभ्यासक्रमात समावेश करणार आहे. ज्ञानाच्या माध्यमातून संपत्ती विकसित करण्याचा यापुढील काळात प्रयत्न राहणार असल्याचे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी 'महाराष्ट्र टाइम्स' शी बोलताना सांगितले.**



## आढावा आणि आव्हाने

**■ 'नॅक' आणि रॅंकिंग कसे टिकवणार ?**

नॅशनल इन्स्टिट्यूट रॅंकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) मध्ये मिळाले रॅंकिंग तीन वर्षे कायम राहणार आहे. रॅंकिंगमुळे विद्यापीठाची जबाबदारी आणि विद्यापीठाकडून लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. मिळालेले रॅंकिंग अध्ययन, अध्यापन आणि संशोधनातील कामगिरीचा निकष पाहून मिळाले आहे. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार कृतीत आणणारे येथील नागरिक आहेत. त्यामुळे केवळ नोकरी व परीक्षा याचा विचार करुन पदवीप्राप्त विद्यार्थी न घडवता त्याचा समाजाला कसा उपयोग होईल यावर भर दिला जाईल. रॅंकिंगमध्ये विद्यापीठाला शंभर पैकी ९० गुण मिळविले आहेत. यामध्ये विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी, प्राध्यापक, पालक आणि माध्यमांनी मांडलेली सकारात्मक भूमिका कारणीभूत ठरली आहे. विद्यापीठाने मिळवलेल्या रॅंकिंगबद्दल राज्यपाल सी. विद्यासागर राव, शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी अभिनंदन करुन ग्रामीण भागापर्यंत पोहोचण्याचा संदेश दिला आहे. यानुसार प्रत्येक घटकांशी चर्चा करुन विद्यापीठ अधिकाअधिक लोकाभुमिख होईल यासाठी भर दिला जाणार आहे.

**■ रॅंकिंग वाढवण्यासाठी काय प्रयत्न सुरू आहेत ?**

वाढलेल्या अपेक्षा आणि जबाबदारी पूर्ण करण्यासाठी प्रथमच यशाचे मूल्यमापन करणार आहे. अपयशाचे नेहमीच मूल्यमापन केले जाते, मात्र प्रथमच यशाचे मूल्यपान करुन छोट्या-छोट्या त्रुटींवर उपाय शोधण्यासाठी विद्यापीठ विभागप्रमुखांची बैठक घेणार आहे. त्यांचा विश्वास संपादन करुन त्यांच्याकडून प्रतिसाद घेणार आहे. यासाठी समाजाचा आणखी सहभाग वाढवण्यावर भर देणार आहे. विद्यापीठाची सामाजिक बांधिलकी कशी राहिल याचाही रॅंकिंगवेळी विचार केला गेला असल्याने दुष्काळी भागातील जत, आटपाडी भागात अन्नधान्य व चारा वाटप करण्यात येणार आहे. विद्यापीठ किंवा अन्य ठिकाणावरुन संशोधन घेतलेल्या शिक्षित लोकांचा मार्गदर्शन घेवून रॅंक वाढवण्याचा प्रयत्न करणार आहे. यासाठी उद्योजक, लोकप्रतिनिधी, संस्थाचाचालक यांच्याशी चर्चा करुन दर्जा वाढवण्याचा प्रयत्न करणार आहे.

**■ संशोधनातील विद्यापीठाचे स्थान ?**

संशोधनात शिवाजी विद्यापीठ आघाडीवर आहे. 'एच' इंडेक्समधील पहिल्या ६० मध्ये विद्यापीठाचा समावेश आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सी. एन. आर. राव यांनी विद्यापीठ संशोधनामध्ये आघाडीवर असल्याचे सांगितले आहे. मात्र बहुतांशी संशोधन प्रबंधांमध्ये अडकून राहते. यासाठी पेटंटच्या माध्यमातून संशोधनाचा सर्वसमावेशक करण्याचा प्रयत्न विद्यापीठाचा राहणार आहे. ज्ञानातून संपत्ती विकसित करण्यावर भर दिला जाईल. एखाद्या उद्योगसाठी मॉडेल तयार करुन त्याचे पेटंट मिळवण्यासाठी प्रयत्न होईल. याच माध्यमातून इचलकरंजी येथील डीकेटीई येथे देशातील टेक्सस्टाइलमधील पहिले इक्वेटी सेंटर सुरु केले आहे. संशोधन अधिक विकसित करण्यासाठी पदवीस्तरावर संसोधन विषय सक्तीचा करण्यात येणार आहे. उद्योग क्षेत्राबरोबर कन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रिज (सीआयआय) आणि युनिव्हर्सिटी इंडस्ट्रिज इन्फास्ट्रक्चरच्या माध्यमातून विविध संस्था, विद्यापीठांशी सामाजस्य करार केले जात आहेत. याच मध्यमातून सीडॅक बरोबर सामंजस्य करार केला आहे. असे करार करणारे देशातील आयआयटी, पंजाब विद्यापीठानंतर शिवाजी विद्यापीठाचा तिसरा क्रमांक आहे. या करारामुळे विद्यार्थ्यांना सुपर कॅम्प्युटर वापरण्याची संधी मिळणार आहे. यातूनच संशोधन पुढे नेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**■ नवीन योजना काय आहेत ?**

शिवाजी विद्यापीठामार्फत संशोधनाला अधिक चालना देण्यासाठी पदवीस्तरापासून संशोधन विषय सक्तीचा करण्यात येणार आहे. कॉलेजमधील प्राध्यापकांना संशोधनासाठी प्रोत्साहन देण्यासाठी वर्षाला त्यांना अर्थसाह्य देण्यात येणार आहे. विद्यापीठ कॅम्पसमधील विद्यार्थ्यांना फेलोशीपसाठी ५० हजार ते तीन लाखांपर्यंतचे अर्थसाह्य देणार आहे. असे अर्थसाह्य देणारे विद्यापीठे देशातील पहिले विद्यापीठ असेल. तसेच वर्षातील सर्वोत्कृष्ट संशोधक विद्यार्थी व प्राध्यापक म्हणून गौरव करण्यात येणार आहे. कोणत्याही योजना अर्थसाह्याअभावी रखडतात. यासाठी यासाठी अर्थसंकल्पामध्ये यासाठी तरतूद केली आहे.

**■ महिला प्राध्यापिकांची संख्या कशी वाढवणार ?**

महिला प्राध्यापिकांची संख्या बॅकलॉगप्रमाणे भरली जातील. नियमाप्रमाणे महिलांची सर्व पदे भरण्यावर विद्यापीठाचा प्रयत्न राहील. केवळ महिला प्राध्यापिका नव्हे, तर त्यांना जाणिवपूर्वक विविध समित्यांवर महिलांना प्रतिनिधीत्व दिले जाते. महिला व प्राध्यापक अशी दोन मते त्यांच्याकडून नोंदवली जात असल्याने त्याचा फायदा प्रशासनाला जास्त होतो. त्यामुळे विविध समित्यांवर त्यांना प्रतिनिधीत्व देण्यावर विद्यापीठाचा भर असतो.

**■ परीक्षा विभागातील गोंधळ कसा कमी होईल ?**

गतवर्षीपेक्षा परीक्षा विभागात गोंधळ कमी आहे. विद्यापीठाच्या परीक्षा एकेसीएल सॉफ्टवेअरच्यामाध्यमातून घेतल्या जातात. टप्प्याटप्प्याने त्यांची जबाबदारी कमी करण्याचे नियोजन सुरू आहे. त्यामुळे एकाचवेळी दोन-दोन सॉफ्टवेअर चालवताना कसरत करावी लागत आहेत. यासाठी आवश्यकता भासल्यास तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले जाईल. गेल्या चार वर्षापासून क्लिष्ट पद्धतीमुळे गोंधळ सुरू आहे. यातून लवकरच बाहेर पडून विद्यापीठ पुन्हा गतवैभव प्राप्त करेल. त्यामुळे परीक्षांमध्ये होणारा गोंधळ संघटनातील वाद असूच शकत नाही, व्यक्तीसापेक्ष चूक असू शकते. पेपर काढणे गोपनीय असल्याने जोपर्यंत परीक्षार्थींच्या हातात पेपर मिळत नाही, तोपर्यंत चूक लक्षात येत नाही. तरीही चूक करणाऱ्या पेपर सेटरवर कारवाई केली आहे. कोणत्याही व्यक्तीकडून जाणिवपूर्वक चूक होत नाही, पण त्याचा प्रशासनाला त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे अशा गोष्टींवर लवकर निर्बंध आणले जातील.

● मारुती पाटील
maruti.patil@timesgroup.com

# नेचर पब्लिशिंगचा द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार

## विद्यापीठाचे यश : विद्यार्थी ऑनलाइन संदर्भ वापरत असल्याने गौरव

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २२ : जागतिक स्तरावरील नामांकित पालग्रेव्ह मॅकमिलन समूहाच्या 'नेचर पब्लिशिंग ग्रुप'तर्फे 'एनपीजी ई-जर्नल्स युसेज ॲवॉर्ड- २०१५'मधील द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार शिवाजी विद्यापीठाला घोषित झाला असल्याची माहिती विद्यापीठाच्या ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी दिली. 'युनेस्को'च्या जागतिक पुस्तक व कॉपीराइट दिनाच्या पूर्वसंध्येला हा पुरस्कार घोषित झाल्याने याचा आनंद अधिक वाटतो, अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

यूजीसी-इन्फ्लिबनेट सुविधेच्या माध्यमातून नेचर समूहाचे जर्नल संदर्भासाठी सर्वाधिक वापरल्याबद्दल नेचर पब्लिशिंग ग्रुपतर्फे हा वैशिष्ट्यपूर्ण



पुरस्कार घोषित झाला आहे. नेचर प्रकाशन समूहाचे भारतातील सहायक सरव्यवस्थापक राजेंद्र कुमार यांनी ई-मेलद्वारे ही माहिती दिली. विद्यापीठाचे विद्यार्थी संदर्भासाठी ऑनलाइन ई-जर्नल सुविधांचा चिकित्सकपणे वापर करीत आहेत, हे यातून स्पष्ट झाले आहे. प्रथम क्रमांकाचा 'एनपीजी ई-जर्नल्स युसेज ॲवॉर्ड-' कोचीन येथील कोचीन युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स

**''विद्यापीठातील संशोधक मूलभूत संशोधनामध्ये अत्यंत उत्तम कामगिरी बजावत आहेत, हे 'स्कोपस'च्या आकडेवारीवरून वेळोवेळी स्पष्ट झाले आहे. यूजीसी-इन्फ्लिबनेटच्या माध्यमातून जगभरातील आठ हजारांहून अधिक जर्नल आपण विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली आहेत आणि त्यांचा योग्य प्रकारे ते लाभ घेत आहेत, हे महत्त्वाचे आहे. विद्यापीठ कॅम्पसवरील तीन हजार संगणक जोडण्यांच्या माध्यमातून ही सेवा संशोधक विद्यार्थ्यांना चोवीस तास उपलब्ध करून दिली आहे.''**

**डॉ. देवानंद शिंदे,** कुलगुरू

ॲंड टेक्नॉलॉजीला, तर तृतीय क्रमांकाचा पुरस्कार नवी दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठाला जाहीर झाला.

यूजीसीतर्फे विद्यापीठांसाठी इन्फ्लिबनेट अर्थात इन्फोनेट डिजीटल लायब्ररी कॉन्सॉर्शियम हा अत्यंत महत्त्वपूर्ण उपक्रम राबविलेला आहे. याअंतर्गत विद्यापीठातील संशोधक विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणारे जगभरातील विविध विषयांचे जर्नल (संशोधन पत्रिका) व अधिकृत डाटाबेस उपलब्ध करून देण्यात येतात.

आजपर्यंत विद्यापीठात सबस्क्रिप्शनच्या माध्यमातून ५१ व इन्फ्लिबनेटच्या माध्यमातून ८५९९ अशी एकूण ८६४३ ई-जर्नल, १० डाटाबेस संशोधक विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत. नेचर संशोधन पत्रिकेच्या व्यक्तीगत वापरामध्ये २०१४ च्या तुलनेत २०१५ मध्ये भरीव वाढ नोंद झाली. इन्फ्लिबनेटच्या ई-जर्नल वापराच्या आकडेवारीनुसार, हा आकडा ३४ वरून १८४४ इतका वाढला. त्यामुळेच नेचर पब्लिशिंग ग्रुपच्या द्वितीय पुरस्कारास शिवाजी विद्यापीठ पात्र ठरले, अशी माहिती डॉ. खोत यांनी दिली.

केवळ नेचर संशोधन पत्रिकाच नव्हे, तर अन्य संशोधन पत्रिकांच्या एकूण वापरातही २०१५ ला भरीव वाढ दिसून आली आहे. विद्यापीठातील इन्फ्लिबनेट संशोधक वापरकर्त्यांची संख्या २०१४ मध्ये २ लाख ८९ हजार ९२३ इतकी होती; ती २०१५ ला ३ लाख ४ हजार ५५२ इतकी झाल्याचे त्यांनी सांगितले.